| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**<br>**पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,**<br>**जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९** | |

**प्रेस नोट**

**दिनांक - ०६/०६/२०२२**

**मॉर्निंग वॉक करीता गेलेल्या वयोवृध्द महिलेचा खुन करणारे गुन्हेगारास २४ तासामध्ये अटक**
**महाळुंगे पोलीसांची उत्कृष्ट कामगिरी : एक अटकेमध्ये.**

---

दि-०२/०६/२०२२ रोजी पहाटे ०३:३० वा चे सुमारास मौजे मोई, ता-खेड, जि पुणे येथील वयोवृध्द महिला नामे **तानाबाई बबन येळवंडे वय ८५ वर्ष** हया मोई ते निघोजे या रोडने पायी चालत मॉर्निंग वॉक करीत गेल्या होत्या. त्या निघोजे बाजुकडे जावुन पुन्हा राहते घराकडे येत असताना त्यांचे पाठीमागुन पायी चालत आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने कोणतेतरी अज्ञात हत्याराने तानाबाई येळवंडे यांचे डोक्यामध्ये पाठीमागुन मारुन त्यांना गंभीर जखमी केले व त्यांचे गळयातील दिड तोळा वजनाचे सोन्याची पोत जबरदस्तीने काढुन घेवुन सदर जखमी महिलेस रोडचे दुसरे बाजुस असणारे चारीमध्ये टाकुन देवुन अपघात झाल्याचे भासविण्याचा प्रयत्न केला होता. सदर जखमी महिला तानाबाई बबन येळवंडे हीचेवर श्री हॉस्पिटल मोशी येथे औषधोपचार चालु असताना दि ०३/०६/२०२२ रोजी सकाळी १०:०० वा चे सुमारास त्याय मयत झाले आहे.

सदर घटनेचे अनुषंगाने मयत महिलेचा नातु सचिन रामनाथ येळवंडे यांनी घटनेच्या नजिक असणारे घराचे सी.सी.टी.व्ही.फुटेजची पाहणी करुन **अज्ञात व्यक्तीचे विरोधात गुन्हा रजि.नंबर ८८६/२०२२, भा.द.वि.कलम ३९४, ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**मा.पोलीस आयुक्त श्री.अंकुश शिंदे साहेब** यांनी गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने सुचना व मार्गदर्शन केल्याने महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांनी घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळाचे नजिक असणारे सी.सी.टी.व्ही.कॅमेराचे फुटेज स्वतः पाहणी केली. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुळीग व स्टाफ यांचे ३ पथके तयार करुन परिस्थितीजन्य पुराव्या बरोबर तांत्रिक पुरावे गोळा करण्याचे सुचना दिल्या.

महाळुंगे पोलीस चौकीचें गुन्हे शोध पथकामधील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय बातमीदारांमार्फत माहिती घेत परिसरातील ३३ सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणी केली. घटनेच्या दिवशी त्या परिसरामध्ये उशिरापर्यत जागे असणारे व रात्री कामावर जाणारे कामगारांकडे कसुन तपास केला. व गुन्हा घडलेपासुन २४ तासाचे ताब्यात आरोपीस ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.

**अटक आरोपीचे नाव –**
**शिवाजी निवृत्ती लाखनगिरे, वय ४५ वर्ष,** रा-रिव्हर रेसिडेन्सी रोड, आहेर बिल्डींग, मोशी, जि पुणे. मुळगाव-मानखेड, ता-अहमदपुर, जि-लातुर असे असुन **त्यास दि ०८/०६/२०२२ पर्यत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री मंचक इप्पर,** सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग **श्री.सागर कवडे,** वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक(गुन्हे) दशरथ वाघमोडे, सहा.पोलीस निरीक्षक **दत्तात्रय गुळीग**, पोलीस अंमलदार- **राजु कोणकेरी, अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, युवराज बिराजदार, तानाजी गाडे, किशोर सांगळे, संतोष काळे, अमोल निघोट, प्रशांत वहिल, शिवाजी लोखंडे, शरद खैरे, बाळकृष्ण पाटोळे,** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक **दशरथ वाघमोडे** हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर